# एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयात माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात

महाविद्यालयीन आठवणींना उजाळा देत एमजीएम अन्नतंत्र महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी स्नेहमेळावा दि . २०.०२.२०२० रोजी उत्साहात पार पडला. महात्मा गांधी मिशन संस्थेच्या अंतर्गत अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाची स्थापना शैक्षणिक वर्ष २००८- ०९ मध्ये झाली. तेंव्हापासून २०२० पर्यंतच्या म्हणजेच १२ वर्षातील महाविद्यालयाचे शासकीय तसेच अन्नप्रक्रिया आणि संशोधन क्षेत्रात कार्यरत असलेले १५० विद्यार्थी या मेळाव्यात सहभागी झाले होते. मेळाव्याच्या निमित्ताने परत एकदा एकत्र आलेले सर्व माजी विद्यार्थी आठवणीत हरवून गेले होते . 'प्रत्येकजण आपलं महाविद्यालय कसं आहे, हे डोळ्यांमध्ये साठवून घेत होता. वर्ग मित्र भेटल्याचा आनंद सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होता.

महात्मा गांधी मिशनचे सचिव मा. श्री. अंकुशराव कदम हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर संस्थेचे उपाध्यक्ष मा. डॉ. पी. एम. जाधव यांच्यासह अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय परभणी चे सहयोगी अधिष्ठाता तथा प्राचार्य डॉ. ए. आर. सावते, एमजीएम हिल्सचे संचालक डॉ. जी. आर. रेड्डी, महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. ई. एस. पाटील, प्राचार्य तथा कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. आर. व्ही. काळे, डॉ. एन. आर. चव्हाण, डॉ. ए. के. पांडे, एमजीएम कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. वसंत देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी शासकीय सेवेत कार्यरत असलेले आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रात उद्योजक असलेल्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलतांना संस्थेचे सचिव मा. अंकुशराव कदम म्हणाले कि, 'या मेळाव्याच्या आयोजनामुळे एक नवीन दिशा मिळणार आहे. तसेच कृषिशिक्षणाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील प्रत्येक काम करता येईल अशी "ग्रीन आर्मी" बनवून विद्यार्थ्यांना विशेष कौश्यल्यासह स्वयंपूर्ण बनविण्याचा उद्देश त्यांनी व्यक्त केला. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव म्हणाले कि, 'माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येवून माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करावी. यामध्ये प्रत्येकाला काम करण्याची संधी मिळेल. त्याद्वारे महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासाला चांगली दिशा देण्याचे काम करता येईल. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. व्ही. काळे यांनी या मेळाव्याचे आयोजन आणि माजी विद्यार्थ्यांची संघटना स्थापन करण्यामागील हेतु स्पष्ट केला.

मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवृंद, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. डॉ. आर. एच. जाजू यांनी कार्यक्रमाचे सहसमन्वयक म्हणून काम पहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जी. एस. राऊत यांनी केले. महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना स्थापन करण्याचा संकल्प यावेळी जाहिर करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी महाविद्यालयाच्या वाटचालीस शुभेच्छया दिल्या.



**"कृषिशिक्षणाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रातील प्रत्येक काम करता येईल अशी "ग्रीन आर्मी" बनवून, प्रत्येक विद्यार्थी विशेष कौश्यल्यासह स्वयंपूर्ण झाल्यावरच कृषिशिक्षणाचा उद्देश साध्य झाला असे म्हणता येईल."**

— मा. श्री. अंकुशराव कदम, सचिव महात्मा गांधी मिशन



**"माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येवून माजी विद्यार्थी संघटनेची स्थापना करावी. त्याद्वारे शैक्षणिक दर्जा सुधारून प्लेसमेंटला चालना मिळेल तसेच गरजू विद्यार्थ्यांसाठी या संघटनेद्वारे उपयुक्त उपक्रम राबवता येतील."**

— डॉ. पी. एम. जाधव, उपाध्यक्ष महात्मा गांधी मिशन



**"विद्यार्थ्यांनी ज्ञानग्रहण करण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करून आपल्या कार्यक्षेत्रात समर्पक वृत्तीने काम केल्यास कार्यक्षेत्रातील उच्चं पदावर पोहचण्यास अनेक संधी प्राप्त होतील"**

— डॉ. ए. आर. सावते, सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य



**"शिक्षणासोबतच कौश्यल्यधारित व्यक्तिमत्व विकास घडविणारे महाविद्यालयीन जीवन म्हणजे आयुष्याचा सुवर्णमध्य होय."**

— डॉ. जी. आर. रेड्डी, संचालक एमजीएम हिल्स